जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ४३१ दिनांक - १३/०६/२०२३

**वानवडी पोलीस स्टेशन,पुणे शहर**

## खंडणी व दहशत पसविणारा तडीपार आरोपी " टिंक्या शेलार " वानवडी पोलीसच्या जाळयात.

वानवडी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये पाहिजे, फरारी, तडीपार आरोपी शोध घेवून प्रभावी कारवाई करण्याकरीता वरिष्ठांचे आदेशाने दि.११/०६/२०२३ रोजी तपास पथकाचे प्रभारी पोलीस अधिकारी पोउपनि संतोष सोनवणे व अंमलदार वानवडी पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना, गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या बातमीप्रमाणे वानवडी पोलीस ठाणेकडील तडीपार गुन्हेगार नामे **सचिन ऊर्फ टिंक्या पोपट शेलार, राहणार आझादनगर, वानवडी,पुणे** यास हॉटेल स्टेप इन समोर, साळुंखे विहार रोड, वानवडी येथून फिल्मी स्टाईलने पाठलाग करून ताब्यात घेवून अटक केली आहे.

सदर तडीपार आरोपीस **मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ ५, पुणे शहर यांनी दि.१६/०३/२०२२ रोजी पासुन दोन वर्षाकरीता पुणे शहर पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय व पुणे जिल्हयाचे हद्दीतुन तडीपार केले आहे** तडीपार असतानाही त्याने पुणे शहरात येण्यासाठी कोणाचीही पुर्वपरवानगी न घेता बेकायदेशीररित्या आला होता. त्याप्रमाणे त्यांचेवर वानवडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २७२/२०२३ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून दाखल गुन्हयाचा पुढील तपास सहा.पोलीस फौजदार आर आर रासगे, वानवडी पो.स्टे. हे करीत आहेत. अटक आरोपीत यांचे नाव पुढील प्रमाणे सचिन ऊर्फ टिंक्या पोपट शेलार, रा.आझादनगर, वानवडी,पुणे

अटक करण्यात आलेला तडीपार आरोपी सचिन ऊर्फ टिंक्या पोपट शेलार याचेवर वानवडी पोलीस स्टेशन तसेच पुणे शहरातील विविध पोलीस स्टेशनमध्ये गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. वरील अटक आरोपी वानवडी पोलीस ठाणे मधील गु.र.नं. ४४६/२०२२भा.द.वि.कलम ३८५,३८६,३८७,३२३,५०४,५०६(२),भारतीय शस्त्र अधिनियम कलम४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२,३७(१)(३),१३५,क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट १९३२ चे कलम ७(२) प्रमाणे गंभीर गुन्हयातील पाहिजे आरोपी असुन तो गुन्हा दाखल झाल्यापासून वेशांतर करून तसेच आपले अस्तित्व लपवून वावरत होता. सबब सदरचा गुन्हा देखील उघड झालेला आहे.

सदरची कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशीक विभाग, पुणे शहर श्री रंजनकुमार शर्मा, मा. पोलीस उप आयुक्त परि.-५,पुणे शहर श्री विक्रांत देशमुख व मा.सहा.पोलीस आयुक्त, वानवडी विभाग, पुणे शहर श्री साळवे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरिक्षक भाऊसाहेब पटारे,व तपास पथकातील पोलीस उप निरिक्षक संतोष सोनवणे,सपोफौ.रासगे,हरिदास कदम,पोलीस अंमलदार विठ्ठल चोरमले,अमोल गायकवाड,निळकंठ राठोड,यांनी केली आहे.


महाराष्ट्र पोलीस
वानवडी पोलीस ठाणे
पुणे शहर
फोन नं. : ०२०-२६८२५१८१